आतील पानात वाचा
- अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांची भाषा अरेरावीची
- संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून जागविली देशभक्तीची भावना
- संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व डॉ.अनिल अवचट...

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १६६, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२८ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मुंबईसह कोकणात पावसाच्या सरी; मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात पावसाचा यलो अलर्ट

## हिवाळ्यात पाऊस झाल्याने वातावरणात बिघाड !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** महाराष्ट्रातील हवामानात लक्षणीय बदल होत आहे. सततच्या वातावरणातील चढ-उतारामुळे नागरिकांच्या आरोग्यावरही याचा परिणाम होताना दिसतो आहे. मागील अनेक दिवासांपासून मुंबईसह राज्यभरात कडाक्याची थंडी होती. आता मात्र थंडीचा कडाका कमी होत आहे. मात्र आता थंडीनंतर अचानक राज्यभरातील अनेक भागात पावासाच्या सरींनी हजेरी लावली. मुंबईसह रायगडमध्येही पावसाच्या सरी कोसळल्या. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाचा परिणाम राज्याच्या काही भागांवर होईल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील एकूण ६ जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.



हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मराठवाड्यात ढगाळ हवामान असेल. मराठवाड्यासह उत्तर महाराष्ट्रात हलका ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २७ जानेवारीपासून महाराष्ट्रात थंडीचा जोर कमी होईल, परंतु दिवसा तापमानात वाढ आणि उष्ण हवामानाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**कोकण, मुंबईत हवामानाची स्थिती काय?**

कोकण आणि मुंबई परिसरातही ढगाळ वातावरण आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसंच मुंबई-ठाणे परिसरात सकाळी हलक्या धुक्यासह पावसाच्या तुरळक सरींनी हजेरी लावली. मुंबईत दुपारीही आकाश अंशतः ढगाळ असेल. किनाऱ्यावर मध्यम ते जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. दुपारी काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता आहे. मुंबईत कमाल तापमान २८ ते ३२अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १८ ते २२ अंश सेल्सिअसपर्यंत असेल.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यात हवामान कोरडं असेल. तर दुपारनंतर तापमानात वाढ होऊन उष्णता जाणवेल. कमाल तापमान २९ ते ३३ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १४ ते १८ अंश सेल्सिअस असण्याचा अंदाज आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार भागातही दिवसभर ढगाळ हवामान असेल. उत्तर महाराष्ट्रात हवामान खात्याने काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवली आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड आणि लातूर भागातही ढगाळ वातावरण असेल. २७ आणि २८ जानेवारी रोजी काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. विदर्भात नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये हवामान अंशतः ढगाळ असेल. तर काही भागात हलक्या सरींची शक्यता आहे.

# अनावधानाने चूक, तर अनावधानाने मंत्रीपद काढा,

# गिरीश महाजनांविरुद्ध प्रकाश आंबेडकर आक्रमक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, पुणे :** प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात पालकमंत्री गिरीश महाजन यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख टाळल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणावरून आता वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी गिरीश महाजन यांच्या मंत्रिमंडळातून हकालपट्टीची मागणी केली आहे. ज्या संविधानामुळे तुम्ही मंत्री झालात, ते संविधान कोणी लिहिलं हेच जर तुम्हाला माहिती नसेल, त्यांचं नाव तुम्हाला घेता येत नसेल तर तुम्हाला पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, अशा शब्दांत आंबेडकरांनी महाजनांवर तोफ डागली आहे, त्यांनी आज पुण्यात माध्यमांशी संवाद साधला.

**आरएसएसची भूमिका दुतोंडी !**

प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही निशाणा साधला. ते म्हणाले की, आरएसएस नेहमीच दुतोंडी भूमिका घेते.



एकीकडे आम्ही बाबासाहेबांना मानतो असे म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्या विचारांच्या विरोधात कृती करायची. हिंदू कोड बिलाला सर्वात आधी विरोध कोणी केला असेल तर तो आरएसएसनेच केला होता. मनुस्मृतीने महिलांना हिंदू धर्मात कोणताही अधिकार दिला नव्हता ना मालमत्तेचा, ना वैयक्तिक, ना स्वतःच्या शरीराचा. हे सर्व अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिले. त्यामुळेच आज एक महिला अधिकारी (माधवी जाधव) जाब विचारण्यासाठी पुढे आली.

**स्क्रिप्ट लिहिणाऱ्यांवरही कारवाई करा**

या वादावर गिरीश महाजन यांनी 'अनावधानाने' चूक झाल्याचे म्हटले होते. त्यावर उत्तर देताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, जर ही चूक अनावधानाने झाली असेल, तर तुमचे मंत्रीपदही अनावधानाने काढून टाकण्यात यावे. ही काही छोटी-मोठी चूक नाही.

ज्यांनी हे भाषण लिहून दिले त्यांच्यावर आणि ज्यांनी वाचले त्यांच्यावरही कठोर कारवाई झाली पाहिजे. महाजनांनी स्वतःच्या हाताने भाषण लिहिले असेल किंवा कोणी लिहून दिले असेल तरीही त्यांनी आंबेडकरांचे नाव वाचले नसेल, तर त्यांच्या कर्तव्यातील कसूर आहे, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी

**आंदोलनांवर स्पष्टीकरण...**

लोकांनी आता या अन्यायाविरोधात स्वतःहून पुढाकार घेतला आहे, वंचित बहुजन आघाडीने कुठे आंदोलन केलेले नाही, असेही स्पष्टीकरण यावेळी आंबेडकरांनी दिले आहे.

# कोळसेवाडी पोलिसांची कामगिरी; दुचाकी चोरीचा गुन्हा उघड, आरोपी गजाआड

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.२७, कल्याण :** कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीत शिळफाटा रोडवरील आर.डी. बार परिसरातून चोरीस गेलेली हिरो कंपनीची एक्सट्रीम १२५ आर दुचाकी पोलिसांनी यशस्वी तपास करत हस्तगत केली असून, संबंधित आरोपीस अटक करण्यात आली आहे.

दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.३० ते २३ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० या कालावधीत, आर.डी. बार, शिळफाटा रोड, कल्याण पूर्व येथे पार्क केलेली एम.एच.-०५-एफ.एन.-१०४३ क्रमांकाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गु.रजि. नं. ९१४/२०२६, भा.न्या.सं. २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याच्या तपासादरम्यान घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज व मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी आरोपीची ओळख पटवली. त्यानुसार धनेश्वर नारायण महतो (वय ३०), रा. भराडी आई बिल्डिंग, रूम नं. २१६, जिमखाना रोड, आजदे गाव, डोंबिवली पूर्व यास अटक करण्यात आली. आरोपीकडून सुमारे ५५ हजार रुपये किमतीची एक्सट्रीम १२५ आर दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-३, कल्याण) . अतुल झेंडे व सहाय्यक पोलीस आयुक्त (कल्याण विभाग) कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली, कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांच्या सूचनेनुसार करण्यात आली. या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप भालेराव यांच्यासह गुन्हे प्रकटीकरण पथकातील कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

पोलिसांच्या तत्पर व प्रभावी कारवाईमुळे वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस आला असून, नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# मुंबई आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रोने जोडणार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान मेट्रो मार्गिका ८ च्या ३५ किलोमीटरच्या जोडणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पायाभूत सुविधा प्रकल्पाला आवश्यक असलेले भूसंपादन आणि सर्व प्रकारच्या परवानग्या प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रकल्प सुरू होण्यापूर्वी पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. तसेच कुठलाही पायाभूत सुविधा प्रकल्प भूसंपादनानंतर पुढील तीन वर्षात पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ.पी. गुप्ता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक डॉ.अनिल गायकवाड, महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित आदी उपस्थित होते. बैठकीमध्ये अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मनीषा म्हैसकर आणि सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सादरीकरण केले.



**पायाभूत प्रकल्पांविषयी...**

- छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मेट्रो लाईन ८ जोडणीस मान्यता.
- मेट्रो मार्गाची एकूण लांबी ३५ किलोमीटर, भूमिगत मार्ग ९.२५ किलोमीटर, उन्नत मार्ग २४.६३६ किमी, एकूण २० स्थानके, ६ स्थानके भूमिगत, १४ स्थानके उन्नत.
- छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ स्थानक ते घाटकोपर (पूर्व) पर्यंत भूमिगत स्थानके.
- घाटकोपर (पश्चिम) स्थानक ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल दोन स्थानकापर्यंत उन्नत स्थानके, दोन स्थानकांतील सरासरी अंतर १.९ किलोमीटर.
- ३०.७ हेक्टर भूसंपादनाची आवश्यकता, भूसंपादनासाठी ३८८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एकूण २२ हजार ८६२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित.

# छ.संभाजीनगर गुन्हे शाखेचा छापा; १६ लाखांचे अंमली सिरप जप्त

**दि.२७, छ.संभाजीनगर :** शहरात अमली पदार्थांविरुद्ध विशेष मोहीम राबवत असताना गुन्हे शाखेने एका मोठ्या आंतरजिल्हा रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. सलग दुसऱ्या दिवशी केलेल्या या कारवाईत पोलिसांनी लातूर येथून १६ लाख ३२ हजार रुपये किमतीच्या कोडीनयुक्त कफ सिरपच्या ४,०८० बाटल्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी लातूरच्या एका मेडिकल स्टोअर मालकाला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

**असा झाला रॅकेटचा पर्दाफाश**

सिटी चौक पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास करत असताना, या तस्करीचा मुख्य दुवा लातूरमध्ये असल्याचे पोलिसांना समजले. 'मराठवाडा मेडिकल'चा मालक सय्यद शाहीद अली (वय ३०) हा या अमली सिरपचा मुख्य पुरवठादार असल्याची गोपनीय माहिती मिळताच, गुन्हे शाखेचे पथक लातूरला रवाना



झाले. पोलिसांनी गंजगोलाई परिसरात सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले आणि त्याच्या माहितीवरून एका ट्रान्सपोर्ट गोदामातून ३४ बॉक्स जप्त केले.


**फरार आरोपीचा शोध सुरू...**

तपासात धक्कादायक बाब समोर आली आहे की, हा साठा संभाजीनगरमधील रेकॉर्डवरील फरार आरोपी अशपाक पटेल याला दिला जाणार होता. अशपाक पटेल हाच या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार आणि गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अक्षराज



# संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व डॉ.अनिल अवचट



मुक्तांगणचे संस्थापक जेष्ठ समाजसेवक, पत्रकार, चित्रकार, प्रसिद्ध लेखक, बाल साहित्यकार डॉ.अनिल अवचट (बाबा) यांची काल म्हणजे २७ जानेवारी रोजी चौथी पुण्यतिथी होती. चार वर्षापूर्वी म्हणजे २७ जानेवारी २०२२ रोजी अनिल अवचट यांचे वयाच्या ७८ व्य वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने एक बहुआयामी, संवेदनशील व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ अनिल अवचट यांचा जन्म २६ ऑगस्ट १९४४ रोजी पुणे जिल्ह्यातील ओतूर या गावात झाला. लहानपणापासून अभ्यासात हुशार असणाऱ्या अनिल अवचट यांनी पुणे शहरातील बी जे मेडिकल कॉलेजमधून एम बी बी एस चे शिक्षण पूर्ण केले. कॉलेज जीवनात असताना त्यांनी अनेक चळवळीत भाग घेतला. युवक क्रांती दलाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. डॉ अनिल अवचट हे पेशाने पत्रकार आणि लेखक होते. आपली लेखणी त्यांनी कायमच सामान्य जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ अनिल अवचट हे स्वतः पत्रकार होते तरी त्यांनी पत्रकारितेतील व्यावसायिकतेला नेहमीच नकार दिला. त्यांनी आपली पत्रकारिता नेहमीच गरिबी, भ्रष्टाचार, अन्यायाचे बळी असलेल्या जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ अनिल अवचट यांनी गरीब, मजूर, दलीत, वंचित, भटक्या, विमुक्त जाती जमाती, वेश्या यांच्या प्रश्नांविषयी विपुल लेखन केले. विविध प्रश्नांवर लढा देताना आपले आयुष्य एखाद्या प्रश्नांसाठी खर्च करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयीही त्यांनी लेखन केले. १९६९ साली त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्या पुस्तकाचे नाव पूर्णिया असे होते. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. त्यांची एकूण २२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे लेखन प्रेरणादायी होते. तरुण लेखकांचे ते प्रेरणास्रोत होते. तरुण लेखकांना मार्गदर्शन करण्यात ते नेहमीच पुढे असत. डॉ

**श्याम ठाणेदार, दौंड जि.पुणे**
**संपर्क : ९९२२५४६२९५**

अनिल अवचटांच्या लिखणाप्रमाणेच त्यांचे सामाजिक कार्यही प्रेरणादायी आहे. डॉ अनिल अवचट हे पुण्यातील मुक्तांगण वयसनमुक्ती केंद्राचे संचालक होते. त्यांनी आपल्या पत्नी डॉ सुनंदा अवचट यांच्या सहकार्याने व्यसनमुक्तीची शोधलेली अनोखी पद्धत ही जगभरातील अनेक व्यसनमुक्ती केंद्रात वापरली जाते.

मुक्तांगणच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांना व्यसनमुक्त केले आहे. व्यसनमुक्ती क्षेत्रात त्यांचे कार्य अतुलनीय असे आहे. डॉ अनिल अवचट हे केवळ लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते नव्हते तर एक उत्तम कलाकारही होते. त्यांची चित्रे, लाकडातील शिल्पे, ओरिगामी, छायाचित्रे, बासरी वादन यातून त्यांच्या अंगभूत कलांची ओळख होते. सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. डॉ अनिल अवचट यांची पुस्तके सलग तीन वर्ष महाराष्ट्र शासनाने सर्वोत्कृष्ट पुस्तके म्हणून जाहीर केली आहेत. अमेरिकेतील ओहीओ प्रांतात झालेल्या आंतरराष्ट्रीय लेखकांच्या संमेलनात त्यांच्या साहित्याचा गौरव करण्यात आला होता. सातारा येथील न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान तर्फे दिला जाणारा सामाजिक न्याय पुरस्कार (२००७), साहित्य अकादमीतर्फे प्रथम बाल साहित्य पुरस्कार (२०१०), महाराष्ट्र राज्य पुरस्कार (२०११) तसेच त्यांच्या मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राला पुल कृतज्ञता पुरस्कार (२०१५) अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरिवण्यात आले आहे. त्यांच्या निधनाने संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. डॉ.अनिल अवचट यांना चौथ्या पुण्यतिथीनमित्त विनम्र अभिवादन!

# बालपणीही धर्माची लाज राखणारे लाला लजपतराय !

## वाचक पत्र

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात गाजलेली त्रयी म्हणजे लाल–बाल आणि पाल. यातील पहिले लाल म्हणजे लाला लजपतराय. २८ जानेवारी १८६५ मध्ये जन्मलेल्या लाला लजपतराय यांनी स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान दिले. १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचीं स्थापना करण्यातही त्यांची भूमिका महत्वाची होती. स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबद्दल त्यांना 'पंजाब केसरी' ही पदवी देण्यात आली होती. आर्य समाजाच्या माध्यमातून त्यांनी अनेकांमध्ये देशप्रेमाची ज्योत जागवली. लाला लजपतराय यांचे वडील शिक्षक होते. एकदा हिंदु धर्माबद्दल त्यांच्या मनात विकल्प निर्माण झाले आणि त्यांनी मुसलमान बनण्याचा निर्णय घेतला. इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी मशिदीच्या पायर्या चढत असतांना मागे त्यांची पत्नी छोट्या बाळाला कडेवर घेऊन रडत रडत पतीला मागे फिरण्यासाठी आणि मुस्लिम धर्म न स्वीकारण्यासाठी विनवण्या करत होती; पण लाला लजपतराय यांच्या वडिलांनी मुसलमान धर्म स्वीकारण्याचा निर्णय निश्चित केला होता. त्याच वेळी त्यांच्या पत्नीच्या कडेवर असलेले बाळ इतक्या मोठ्याने रडायला लागले की, आता त्याचे प्राण जातील कि काय, असे वाटू लागले. लाला लजपतराय यांच्या वडिलांना मशिदीत घेऊन जाणार्या मुसलमानाने सांगितले, प्रथम मुलाला वैद्याकडे घेऊन जा. त्याच्यावर उपचार करा आणि नंतर मशिदीत या. बाळाला वैद्याकडे घेऊन गेल्यावर ते लगेच गप्प झाले. त्याला काहीही झाले नसल्याचे वैद्यांनी सांगितले. त्यानंतर लाला लजपतराय यांच्या वडिलांचे मुसलमान धर्म स्वीकारणे स्थगित झाले. बाळाच्या नामकरण विधीच्या वेळी आईने बाळाचे नाव लाजपतराय ठेवण्यास सांगितले. पंजाबमध्ये 'पत' या शब्दाचा अर्थ 'धर्म' असा आहे. बाळाने धर्माची लाज राखली; म्हणून त्याचे नाव लाजपतराय ठेवले आणि मोठा झाल्यावर हाच मुलगा वैदिक हिंदू धर्माचा प्रसार करणारा आर्य समाज आणि भारत देश यांचा थोर नेता बनला.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांची भाषा अरेरावीची




अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची अलीकडच्या काळातील कृती व काही व्यक्तव्ये अरेरावीची आहेत. या जगात आपले अमेरिका हे एकच राष्ट्र श्रीमंत आहे अशा थाटात त्यांची अनेक विधाने आहेत. अलीकडे त्यांनी व्हीएनझुलवर हल्ला करून तेथील अध्यक्षांना लष्करी कारवाईने पकडून अमेरिकेत डांबून ठेवले आहे. तेथे असलेल्या तेलावर अमेरिकेला नियंत्रण हवे आहे. एका सार्वभौम राष्ट्राच्या अध्यक्षाला ही वागणूक अत्यंत अपमानास्पद आहे.

संयुक्त राष्ट्रासारखी संघटना अशा वेळी काय करते ? कोणीही राष्ट्राने यावे व कोणालाही पकडून न्यावे अशी अवस्था अमेरिकेची झाली आहे भारत रशियाकडून तेल गेली अनेक वर्षे घेत आहे. हे तेल रशियाकडून घेउ नये या हेतूने अमेरिकेने अनेक वस्तुवरची ट्रीफ वाढवून ती ५० टक्क्यापर्यंत नेली. अनेक राष्ट्रावर अशा मार्गाने अमेरिकेने दबाव वाढविला आहे. अमेरीकन व्हिसा वरही अनेक बंधने आणली आहेत. हे सारे अमेरिकेत मान्य आहे असे नाही. तेथील लोकांनी यास विरोध केला आहे अनेक ठिकाणी लोकांनी निषेध मोर्चे काढले आहेत. पण त्याची पर्वा ट्रम्प याना नाही. आता त्यांचे लक्ष ग्रीनलँड आहे तेथील खनिज संपत्तीवर त्यांचा डोळा आहे. अगदी अलीकडेच दावोसला जाताना त्यांच्या विमानात बिघाड झाल्यामुळे ते माघारी वाळवावे लागले. त्यामुळे संशय मनात ठेवून त्यांनी इराणला दम दिला ग्रीनलँड व डेन्मार्क च्या अध्यक्षां ना त्यांनी अशाच धमक्या या अगोदर दिलेल्या होता. ट्रम्प यांना शांततेचा नोबल पुरस्कार हवा होता. तो न मिळाल्याने नार्वेच्या अध्यक्षांना ट्रम्प यांनी असेच सुनावले होते.

इराणवर हल्ला करण्याचा त्यांचा डाव आहे याला युरोप मधील अनेक राष्ट्रांनी जसे कॅनडा, ब्रिटन, जर्मनी इत्यादी राष्ट्रांनी विरोध केला आहे युरोपात ट्रम्प विरोधी वातावरण तयार होऊ लागले आहे. याची दखल ट्रम्प यांना घ्यावीच लागेल ट्रम्प यांच्या अशा वागण्यामुळे जगात तिसरे महायुद्ध पेटण्याची दाट शक्यता आहे. असे झाल्यास जगात महागाईच डोंब उसळेल. महागाई प्रचंड वाढेल हे सारे दिसत असतानाही ट्रम्प आपली अरेरावी चालूच ठेवत आहेत अमेरिकेची लोकशाही जगात सर्वात जुनी आहे. ट्रम्प यांच्या वागण्यामुळे या लोकशाहीला ग्रहण लागले आहे जगातील प्रत्येक राष्ट्राला जगण्याचा हक्क आहे त्याचे हक्क हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही आता अमेरिकेत विरोधी जनमत तयार व्हावयास पाहिजे. तरच अशा गोष्टीना आळा बसेल.

**– शांताराम वाघ, पुणे**

# स्वप्नांचा जिवंत दस्तावेज



२६ जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत गौरवशाली, अर्थपूर्ण आणि आत्मपरीक्षणाची संधी देणारा दिवस आहे. सन १९५०मध्ये याच दिवशी भारतीय राज्यघटना अंमलात आली आणि भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून औपचारिकरीत्या अस्तित्वात आला. आज, ७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपण केवळ ध्वजारोहण, संचलन, भाषणे आणि औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता राज्यघटनेचा आत्मा, आजची सामाजिक-राजकीय-आर्थिक स्थिती आणि या सगळ्या प्रक्रियेत 'आपण' म्हणजे सामान्य नागरिक म्हणून आपली भूमिका व जबाबदारी यांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे.

भारतीय राज्यघटनेच्या जन्मामागे शेकडो वर्षांचा सामाजिक अन्याय, आर्थिक शोषण, जातीय विषमता, स्त्री-पुरुष असमानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या लढ्याचा दीर्घ इतिहास आहे. ब्रिटिश राजवटीखाली भारत केवळ राजकीयदृष्ट्या गुलाम नव्हता, तर सामाजिकदृष्ट्याही तो अंतर्गत विसंगतींनी, रूढी-परंपरांच्या जोखडाने आणि दारिद्र्याने ग्रासलेला होता. स्वातंत्र्यलढा हा केवळ सत्ता हस्तांतराचा संघर्ष नव्हता, तर तो माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवण्याचा व्यापक लढा होता. महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा आणि नैतिकतेच्या बळावर या लढ्याला दिशा दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेला कायदेशीर अधिष्ठान दिले.

राज्यघटना सभेने जवळपास तीन वर्षे, अकरा महिने आणि अठरा दिवस चाललेल्या सखोल चर्चांमधून भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली. जगातील विविध लोकशाही देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून, भारतीय समाजाच्या बहुविध वास्तवाचा विचार करून ही राज्यघटना घडवण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने तयार केलेली राज्यघटना हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून भारतीय समाजाच्या आशा-आकांक्षा, संघर्ष, वेदना आणि स्वप्नांचा जिवंत दस्तावेज आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही राज्यघटनेची चार मूलभूत मूल्ये आजही भारतीय प्रजासत्ताकाचा आत्मा आणि दिशा ठरवणाऱ्या शक्ती आहेत.

राज्यघटनेने दिलेले मूलभूत हक्क हे भारतीय नागरिकांचे संरक्षणकवच आहेत. समानतेचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क आणि घटनात्मक उपायांचा हक्क हे अधिकार नागरिकांना सन्मानाने जगण्याची हमी देतात. परंतु, सद्यस्थितीत या हक्कांचा वापर करताना अनेकदा त्यांचा गैरवापर, संकुचित अर्थ लावणे किंवा राजकीय हेतूंसाठी विकृतीकरण होत असल्याचे दिसते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे; तर सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून विवेकाने व्यक्त होण्याची क्षमता होय, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

आजची आर्थिक आणि सामाजिक स्थिती पाहता भारत प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे जात असतानाच अनेक अंतर्विरोधांना सामोरा जात आहे. पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढती भूमिका यांमुळे भारताची आंतरराष्ट्रीय ओळख अधिक ठळक होत आहे. मात्र त्याचवेळी आर्थिक विषमता वाढत आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी रुंदावत असून मध्यमवर्गीयांचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. बेरोजगारी, महागाई, शेतकरी संकट, असंघटित कामगारांचे प्रश्न हे आजही गंभीर स्वरूप धारण करून समाजासमोर उभे आहेत.

ग्रामीण आणि शहरी भारतातील असमतोल विकास ही आजची मोठी समस्या आहे. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो, तर शहरी भागात स्पर्धा, असुरक्षितता, ताणतणाव आणि सामाजिक दुरावा वाढताना दिसतो. स्थलांतरामुळे झोपडपट्ट्यांची वाढ, पर्यावरणीय ताण आणि सामाजिक विस्कळीतपणा निर्माण होत आहे. सामाजिक पातळीवर जातीय तणाव, धार्मिक ध्रुवीकरण, असहिष्णुता आणि द्वेषमूलक प्रवृत्ती वाढताना दिसतात. राज्यघटनेने सर्व नागरिकांना समानतेची हमी दिली असली, तरी सामाजिक वास्तवात अजूनही भेदभाव, अन्याय आणि शोषण पूर्णपणे संपलेले नाही. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि इतर वंचित घटकांना अजूनही हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसा आणि लैंगिक असमानता या समस्या प्रजासत्ताकाच्या आरोग्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

# भीषण अपघातात चौघांचा मृत्यू

**दि.२७, पंढरपूर :** मंगळवेढ्याजवळ एक भीषण अपघात झाला असून देवदर्शनासाठी निघालेल्या मुंबईच्या भाविकांच्या क्रुझर गाडीला एका मालवाहतूक ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात चार भाविकांचा मृत्यू झाला असून, त्यात तीन महिला आणि एका १४ वर्षांच्या मुलाचा समावेश आहे. इतर पाच ते सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात २६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता पंढरपूर ते सोलापूर महामार्गावर शरद नगर, मल्लेवाडी येथे झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईहून पंढरपूरला विठ्ठलाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांची क्रुझर गाडी मंगळवेढा मार्गे जात होती. ढेकळेवाडी गावाजवळ समोरून येणाऱ्या एका कंटेनर ट्रकने निष्काळजीपणे आणि भरधाव वेगाने चुकीच्या दिशेने येऊन क्रुझर जीपला धडक दिली. या धडकेमुळे क्रुझर गाडी रस्त्याच्या बाजूला जाऊन पलटी झाली. अपघाताचे कारण ट्रक चालकाचा निष्काळजीपणा आणि हयगय असल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं आहे. या भीषण अपघातात योगिनी केकाणे, सोनम अहिरे, आदित्य गुप्ता आणि सविता गुप्ता या चार भाविकांचा जागीच मृत्यू झाला. अंजली यादव, सोहम घुगे आणि इतर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने मंगळवेढा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

## जाहिरात

इथे तिथे जाहिरात
हरेक जण करतात
छबीमाझी दृश्यरुप
आग्रह का धरतात

फोटोसेशनआवडते
किती काय झुरतात
कॅमेरे हवे सोबतीले
फ्लॅश हवे दिस रात

अपेक्षा अशी कशी
रात्री पण प्रकाशात
फिके पडो तुम्हांपुढे
तारे पण आकाशात

गाव मग आधी नाव
स्थान हवे नकाशात
केवळ स्व रूप फक्त
पहावे वाटे आरशात

जयघोष नित्यचालो
उच्चांराव या देशात
प्रतिमा झगमगाटात
झळकावी परदेशात

तुम्हांजागी कुणीपण
दुजा नको अजीबात
गाजत राहो प्रसिध्दी
तुमचीचं रे खबरबात

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ढेकाळे येथे प्रजासत्ताक दिन साजरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, ढेकाळे (पालघर) :** ७७ व्या प्रजासत्ताक दिन जि.प. शाळा ढेकाळे ता. जि. पालघर येथे साजरा करण्यात आला. त्यावेळी ग्रामपंचायत ढेकाळे गांजे चे सदस्य, उपसरपंच, शालेय व्यवस्थापक अध्यक्ष सुबोध कान्हात समाजसेवक व प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. गावचे प्रतिष्ठित व्यक्ती विनायक भोईर यांनी ध्वजारोहण करत अनम ोल मार्गदर्शन केले. यावेळी विविध उपक्रम घेण्यात आले. सदर वेळी शाळेचे प्रमुख शिक्षक भानुदास लोखंडे व शिक्षिका वर्षा ढोवले यांनी विविध शालेय गुणवत्ता काही मार्गदर्शन तसेच अखादम (मदतीचे) केले. यावेळी पल्लवी संखे, सविता बाबर, प्रमिला गांगडे, रमिला काकड, मीनाक्षी भोईर, प्रकाश सामरे यांची उपस्थिती लाभली.

## विंचूरमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२७, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील शासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये भारतीय प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी २०२६) अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीपर वातावरणात साजरा करण्यात आला. विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयासह, ग्रामपंचायत आणि पोलीस चौकी येथेही ध्वजारोहणाचे कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात शानदार सोहळा. येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ कला-विज्ञान महाविद्यालयात मुख्य सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ. सुजित गुंजाळ यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे विधिवत पूजन करण्यात आले, तर स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन जगदीश (काका) जेऊघाले यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण संपन्न झाले. तसेच, सल्लागार समितीचे ज्येष्ठ सदस्य पंढरीनाथ दरेकर यांच्या हस्ते भारत स्काऊट-गाईड ध्वजाचे आरोहन करण्यात आले. ध्वजारोहणानंतर विद्यालयाच्या स्काऊट-गाईड पथकाने राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यालयात विद्यार्थ्यांनी सामूहिक कवायत संचलन सादर केले, ज्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. याप्रसंगी उपस्थितांनी 'साक्षरतेची शपथ' ग्रहण केली.

या कार्यक्रमासाठी विंचूरचे सरपंच सचिन दरेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, उपमुख्याध्यापक, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र चांदे यांनी केले.

इतर शासकीय ठिकाणीही ध्वजारोहण उत्साहात

गावातील इतर महत्त्वाच्या ठिकाणीही प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला :

विंचूर पोलीस चौकी: तीन पाटी येथील पोलीस चौकीत पोलीस नाईक संदीप धुमाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल सागर आरोटे, पोलीस हवालदार भगवान सोनवणे आणि पोलीस कॉन्स्टेबल मानकर उपस्थित होते.

विंचूर ग्रामपंचायत: ग्रामपंचायतीच्या प्रांगणात सरपंच सचिन दरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी ग्रामसेवक, सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळा: येथील ध्वजारोहण देखील सरपंच सचिन दरेकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

नेहरू चौक: येथील ध्वजारोहण फिरोज मोमीन यांच्या हस्ते करण्यात आले.

संपूर्ण गावात प्रजासत्ताक दिनानिमित्त उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मि ळाले.

## सैनिक स्कूल चंद्रपूर येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन भव्यतेने साजरा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, विसापूर (चंद्रपूर) :** सैनिक स्कूल चंद्रपूरने ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या दिमाखात, देशभक्तीच्या भावनेने आणि लष्करी शिस्तीने (दि.२६) सोमवारला साजरा करण्यात आला. अमर जवान स्मारकाला भेट देऊन शहीदांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात झाली. माजी वनमंत्री व बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे आ. सुधीर मुनगंटीवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावण्यात आला, तर राष्ट्रगीताने सोहळ्याला वैभव लाभले. विविध हाऊसमधील कॅडेट्स, मुलींच्या तुकडी आणि बारावीच्या पायोनियर्सनी असाधारण शिस्तीने मार्चपास्ट सादर केला.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण इयत्ता बारावीच्या पहिल्या बॅचच्या कॅडेट्सची पासिंग आऊट परेड ठरली, जी संस्थेच्या इतिहासातील ऐतिहासिक क्षण आहे. यावेळी आ. मुनगंटीवार यांनी भाषणात सैनिक शाळेच्या शिस्तबद्ध नागरिक घडवण्याच्या भूमि केचे कौतुक करून कॅडेट्सना देशसेवा व देशभक्तीची प्रेरणा दिली. सांस्कृतिक कार्यक्रम, पारितोषिक वितरण व आभार प्रदर्शनाने सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमाने सैनिक स्कूल चंद्रपूरच्या भावी नेत्यांची राष्ट्रसेवेची वचनबद्धता पुन्हा अधोरेखित झाली.

## खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात ७७ वा प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२७, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र सौदामिनी प्रांगणात भारताचा ७७ व्या प्रजासत्ताकदिन निमित्त खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश कुमारवार यांच्या हस्ते सौदामिनी परिसरात संविधान उद्देशिकेचे वाचन करून ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या स्पर्धे त विजेता खेळाडूंचा प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सुरक्षा विभागात विशेष प्राविण्य काम केल्याबद्दल सुरक्षा अधिकारी यांचा व ऑपरेशन विभागात उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभियंता व कर्मचारी यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच १४ जानेवारी ते २८ जानेवारी मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त निबंध स्पर्धा व घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील निबंध व घोषवाक्य स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला उपमुख्य अभियंता (प्रशासन) नितीन रोकडे, अधीक्षक अभियंता प्रवीण रोकडे, अधीक्षक अभियंता विलासकुमार उके, अधीक्षक अभियंता कमलेश मुनेश्वर, अधीक्षक अभियंता( स्थापत्य) शिरीष वितोंडे, अधीक्षक अभियंता संदीप देवगडे, वरिष्ठ सुरक्षा व्यवस्थापक सतीवाले, कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यक्रमाप्रसंगी मुख्य अभियंता गिरीश कुमारवार यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाला वीज केंद्राचे अभियंता, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेश नाईक विद्यामंदिर, जुळे सोलापूर येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२६, सोलापूर :** जुळे सोलापूर येथील गणेश नाईक विद्यामंदिर या शाळेत भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण व देशभक्तीच्या वातावरणात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. देशाच्या संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा पोवाडा, तसेच अतिशय शिस्तबद्ध व आकर्षक कवायत प्रकारांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व देशप्रेमाला मिळालेली दाद पाहून उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.

गणेश नाईक विद्यामंदिर ही शाळा शैक्षणिक गुणवत्तेसोबतच सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रभक्तीपर उपक्रम राबविण्यात नेहमीच पहिल्या क्रमांकावर असणारी शाळा म्हणून ओळखली जाते. शाळेचा सुंदर, स्वच्छ आणि हिरवळीने नटलेला परिसर, विविध फुलांनी व झाडांनी प्रसन्न वातावरण निर्माण करणारा असून तो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पूरक ठरत आहे.

या कार्यक्रमास संस्थेचे सचिव राजशेखर बिराजदार पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार साहेबरावजी परबत, रघोजी किडनी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, सोलापूर येथील डॉक्टर निहारिका रघोजी, तसेच शाळेचे मुख्याध्यापक सुरेखा बिराजदार उपस्थित होते, आळगी. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना देशप्रेम, शिस्त आणि संविधानाच्या मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मदन पोलके यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन पाटील एस. एस. यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या भव्य व प्रेरणादायी कार्यक्रमामुळे ७७ वा प्रजासत्ताक दिन विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्तीची नवी ऊर्जा निर्माण करणारा ठरला.

## कुंडलवाडीच्या के. रामलू शाळेचे यश



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२६, कुंडलवाडी :** प्रजासत्ताक दिनानिमित्त के.रामलू नाबाद नगराध्यक्ष सामाजिक ग्रुपतर्फे पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात प्राथमिक गटातून सर्वप्रथम पारितोषिक जि प शाळेस मिळाले तर द्वितीय के.राम लू शाळेस पारितोषिक मिळाले तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक सरस्वती ई-टेक्नो स्कूलला मिळाले. माध्यमिक गटातून सर्वप्रथम मिलिंद विद्यालयाने पारितोषिक पटकावले. द्वितीय पारितोषिक कै. गंगाबाई पोतंना सब्बनवार या शाळेला मिळाले असून तृतीय पारितोषिक के. रामलू शाळेला मिळाले.के.रामलू शाळेतील ध्वजवंदन संचालिका रमा ठक्कूरवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले व शाळेतून भव्य स्वरूपात रॅली निघाली यात विविध महापुरुषांची वेशभूषा त्यांची सुभाषित वचणे, महाराष्ट्र पोलीस, इंडियन आर्मी, लेझिम, डेम्बल, तिरंगा रॅली, भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज, संत गाडगेबाबा अशी या शाळेची भव्य रॅली लोकांची मने जिंकली या शाळेने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पथनाट्य स्पर्धेत सहभागी झाला आणि या शाळेला द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन सय्याराम मुकेरवार यांनी केले. अध्यक्षस्थानी कुंडलवाडी नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार तर प्रमुख अतिथी म्हणून साईनाथ उत्तरवार व तसेच सर्व मान्यवर नवनिर्वाचित नगरसेवक, कुंडलवाडी शहरवासी सर्व पत्रकार बंधू उपस्थित होते. मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष दरबस्तेवार, माधव हळदेकर व तसेच पत्रकार संरक्षण समि तीचे अध्यक्ष दत्ता हमंद व सर्व पत्रकार बांधव कुंडलवाडीतील युवा, वृद्ध, जनता मायबाप उपस्थित होते.

नगरपरिषद कुंडलवाडी येथे ध्वजवंदन झाल्यानंतर या कार्यक्रमात पत्रकारांचा यथोचित सन्मान तथा सत्कार पेन व डायरी देऊन करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात प्रेरणाताई कोटलावार म्हणाल्या की, कुंडलवाडी शहराचा सर्वांगीण विकास करू यात जनतेचं देखील कर्तव्य आहे जनता देखील सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका पार पाडली पाहिजे त्यातूनच कुंडलवाडी शहराचा कायापालट होईल आणि येणाऱ्या एका वर्षात कुंडलवाडी शहराचा नक्कीच विकास घडवून आणू असं त्या म्हणाल्या या कार्यक्रमात बऱ्याच मान्यवरांनी आपापली मते व्यक्त केली. नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार यांच्याकडून पथनाट्य विजेत्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह बक्षीस म्हणून देण्यात आले. यात देशभक्तीपर गीत नागेश साठे व त्यांचा संच यांनी गायले तर स्पर्धेचे उत्कृष्ट परीक्षण प्रा. गोपाळ चौधरी व प्रा.माधव हळदेकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी के.रामलू नाबाद नगराध्यक्ष ग्रुपचे ॲडमिन सयाराम मुक्केरवार, अनिल पेंटावार, साई भोकरे, साई येपूरवार, राजू हमंद,आदींनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन करून आभार नरेश बोधनकर यांनी मानले.

## भक्ती, एकता आणि उत्साहाचे दर्शन : स्काई हाईट सोसाइटीत प्रजासत्ताक दिन सोहळा संपन्न



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२७, बदलापूर :** बदलापूर पश्चिम येथील स्काई हाईट सोसाइटीमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने सकाळी सत्यनारायणाची पूजा भक्तीभावाने पार पडली. या धार्मिक कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसरात सकारात्मक व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

या सोहळ्यास आमदार किसन कथोरे तसेच नवनिर्वाचित नगरसेविका हेमांगी तेजस (बंटी) म्हसकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीम ुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्यांनी उपस्थित नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत समाजातील एकता, सलोखा व सामाजिक जबाबदारी जपण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान लहान मुलांनी सादर केलेल्या नृत्यप्रकारांनी उपस्थितांचे मन जिंकले. मुलांच्या उत्साहपूर्ण सादरीकरणाचा सर्वांनी मनमुराद आनंद घेतला. या निमि त्ताने लहान मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास स्काई हाईट सोसाइटीतील महिला, ज्येष्ठ नागरिक, तरुण वर्ग व लहान मुले म ोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या एकत्रित सहभागातून सामाजिक एकोपा व सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडले. यशस्वी आयोजनाबद्दल सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांसह सर्व सहकारी सदस्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

अक्षराज



# प्रजासत्ताक दिनानिमित्त आश्रमशाळेत स्नेहसंमेलन, बक्षीस वितरण व सांस्कृतिक मेजवानी

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२७, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील दाभाडी येथील आदिवासी विकास विभागांतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू संचलित शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त प्रभातफेरी, घोषणाबाजी, भारतमाता वेशभूषा, संचलन, बँड पथक तसेच ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीला चालना



देण्यासाठी मा. डॉ. राहुलजी कामडी यांनी मागील वर्षी दहावी व बारावीच्या परीक्षेत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ११ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षीस जाहीर केले होते. या उपक्रमाचे सकारात्मक परिणाम दिसून येत मार्च २०२५ च्या दहावी परीक्षेत दाभाडी (वांगणपाडा) येथील कु. वैष्णवी परशुराम खोटरे हिने ९१.२० टक्के गुण मिळवले.

या यशाबद्दल कु. वैष्णवी खोटरे हिला वार्षिक स्नेहसंमेलनात डॉ. राहुलजी कामडी यांच्या हस्ते कुटुंबासमवेत बक्षीस प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. समाजाप्रती कृतज्ञतेची भावना व्यक्त करत हे प्रोत्साहनपर बक्षीस पुढेही सुरू राहील, असे डॉ. कामडी यांनी जाहीर केले. बक्षीस स्वीकारल्यानंतर वैष्णवीने आपल्या मनोगतात पालक, शिक्षक व मार्गदर्शकांचे आभार मानले.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सुमारे २५ ते २६ सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत रोख स्वरूपात बक्षिसे दिली. कार्यक्रमास ग्रामस्थ, पंचायत प्रतिनिधी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी, आरोग्य व शासकीय कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच इयत्ता पहिली ते बारावीतील सुमारे ६५२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख हरेश घेगड यांनी केले. सूत्रसंचालन एम. पी. पवार यांनी केले, तर आभारप्रदर्शन हरेश घेगड यांनी केले. शेवटी 'वंदे मातरम्'ने कार्यक्रमाची सांगता करून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

# संत गाडगे बाबा विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्सहात साजरा

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२७, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील चोरवड येथील देवकीनंदन गोपाला शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड संचलित, संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक देवकते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीताने संपूर्ण परिसर भारावून गेला

संस्थापक अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबीरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रम व शालेय अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे व देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी साबणे यांनी आपले प्रेरणादायी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना देशसेवा, संविधानाचे महत्त्व व राष्ट्रनिष्ठ मूल्यांची जाणीव करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रणदीप हत्तीअंबीरे यांची उपस्थिती होती, तसेच संतोष हत्तीअंबीरे



भागवत थिट्टे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीते साठी मुख्याध्यापक देवकते यांच्यासह साबणे, सय्यद, शेळके, बुगनर, कदम, चव्हाण, भंडारवाड तसेच शिक्षकेतर कर्मचारी वाघमारे, गोडबोले, चोपडे, गुंढे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी, माजी विद्यार्थी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कदम यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन भंडारवाड यांनी केले.

# संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून जागविली देशभक्तीची भावना!

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.२७, पुणे :** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि सृजनसभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय आंतरशालेय प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर संगीत-नृत्य करंडक स्पर्धेत संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी देशभक्तीची भावना जागविली. विविध शाळा व महाविद्यालयांतून आलेल्या स्पर्धकांनी राष्ट्रप्रेमाचा सुरेल व तालबद्ध आविष्कार सादर केला.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा देखील नुकताच संस्थेच्या नऱ्हे कॅम्पसमध्ये पार पडला.



यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते. स्पर्धेत 'देशभक्ती' या विषयावर आधारित समूहगीत गायन, समूह नृत्य तसेच छोटा ख्याल गायन अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

इयत्ता पाचवी ते बारावी, १८ ते २१ वयोगट तसेच खुल्या गटात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेत्यांना धनादेश, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्यभरातील शाळांमधून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलेतून देशभक्तीची भावना प्रभावीपणे मांडली.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि सांस्कृतिक मूल्यांची जोपासना व्हावी, हा या स्पर्धेमागील उद्देश आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांचा सर्वांगीण विकास घडतो. तसेच आजच्या पिढीमध्ये देशभक्तीची भावना जागृत होण्यासोबत आपल्या कला जोपासण्याची मूल्ये देखील रुजतात.

# समाजातील दुर्बल घटक जिल्हाच्या विकासाचा केंद्रबिंदू : पालकमंत्री डॉ.उईके

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्या नेतृत्वात राज्य सरकार शेतकरी, शेतमजूर, महिला भगिनी, आदिवासी, दलित, वंचित यांच्यासह दुर्बल घटकाला विकासाचा केंद्रबिंदू मानून काम करीत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातही जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या नेतृत्वात संपूर्ण जिल्हा प्रशासन दुर्बल घटकाच्या विकासासाठी भरीव कामगिरी करीत आहे, असे गौरवोद्गार राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी काढले. पोलिस मुख्यालय येथे ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खा. प्रतिभा धानोरकर, आ. सुधाकर अडबाले, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा संदेश देतांना पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यात ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत एकूण ३ लक्ष ३३ हजार (१०० टक्के) शेतकऱ्यांची फार्मर आयडी तयार करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १०७३ गावातील ८२५७ हेक्टर झुडपी जंगल जमीन, वन जमीन म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे ५७१ गावांचे डिलिस्टींगचे प्रस्ताव आणि अतिक्रमित जमिनीचे १४९ गावांचे प्रस्ताव असे एकूण ७२० गावनिहाय प्रस्ताव तयार करण्यात आले आहे. यापैकी २४९ प्रस्ताव वन विभागास सादर केले आहे.

'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजने' अंतर्गत जिल्ह्यातील २०९ महिलांना विविध योजनांद्वारे १०० टक्के अनुदानावर लाभ देण्यात येत आहे. पुढे पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, चंद्रपूर पोलिसांनी अथक परिश्रम घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील किडनी रॅकेट प्रकरण उघडकीस आणले व त्यातील आरोपींना देशातील विविध भागातून अटक करुन उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्याने जिल्ह्यात सार्वत्रिक औषधोपचार मोहीम १० ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत



राबविण्यात येणार आहे. घरी आलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समक्ष गोळ्यांचे सेवन करून हत्तीरोग दूरीकरण करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. तत्पुर्वी मुख्य शासकीय कार्यक्रमात ध्वजारोहण करून त्यांनी परेडचे संचलन केले. उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार विविध क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या अधिकारी, खेळाडू व नागरिकांचा यावेळी पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यात आंतरराष्ट्रीय किडनी रॅकेट उघटकीस आणणारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अमोल काचोरे व त्यांचे सहकारी, उत्कृष्ठ तपासाबद्दल सहायक पोलिस निरीक्षक अश्विनी वाकडे, व्हॉलीबॉलमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळावलेली खेळाडू सखी दोरखंडे, दृष्टीहीन बुध्दीबळ क्रीडा स्पर्धेत प्रथम आलेला वेद नीरज पौर, राष्ट्रीय रायफल शुटींग चॅम्पियनशीपमध्ये प्रथम आलेली प्रेरणा मोरे, राज्य ऑलिंपिक संघटनेत निवड झाल्याबद्दल डॉ राकेश तिवारी यांचा समावेश होता.

# थोडक्यात

## कोपरखैरणे पोलीस स्टेशनमध्ये ७७ वा प्राजसत्ताक दिन साजरा...

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२६, कोपरखैरणे :** भारतीय राज्यघटना स्वीकारल्याच्या वर्धापनदिनानिमित्त दरवर्षी संपूर्ण भारतभर २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. २६ जानेवारी १९४९ ला भारताने संविधान स्वीकारले, पण २६ जानेवारी १९५० पासून ते लागू करण्यात आले. यादिवशी पहिले राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी २१ तोफांच्या सलामीसह भारताला




संपूर्ण प्रजासत्ताक राष्ट्र घोषित केलं होतं. हा दिवस भारतीय इतिहासातील महत्त्वाचा दिवस आनंदाने आणि देशभक्तीने साजरा केला जातो. कोपरखैरणे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी पोलीस स्टेशन मधील कर्मचारी आणि नागरिक यांना मोलाचे मार्गदर्शन केले, यावेळी घणसोली येथील सुप्रसिद्ध राजनंदिनी अकॅडमी म्हणजेच दळवी अकॅडमीची मुले, मुली प्रजासत्ताक दिनानिम्मित उपस्थित होते, आजही दळवी अकॅडमी मध्ये भावी पोलीस होणाऱ्या विद्यार्थी यांना भरतीसाठी मार्गदर्शन आणि उत्तम प्रशिक्षण दिले जाते , तर १०० पेक्षा अधिक पोलीस घडवणारे घणसोली मधील अकॅडमी आजही महत्वपूर्ण भूमिका बजावते. तर कोपरखैरणे येथील उत्तम कौस्तकापद कामगिरी केलेल्या पोलीस कर्मचारी यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांनी गुलाब पुष्प देऊन गौरण्यात आले.

तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी तसेच कोपरखैरणे/घणसोली राजनंदिनी अकॅडमीचे संस्थापक प्रदिप दळवी आणि त्यांचे प्रशिक्षणार्थ विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते.

## बल्लारपुरात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, बल्लारपूर (चंद्रपूर) :** भारतीय प्रजासत्ताकाच्या ७७ व्या वर्धापन दिन मोठ्या उत्साहात बल्लारपूरात साजरा करण्यात आला या निमित्ताने मुख्य शासकीय कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालयात पार पडला. यावेळी उपविभागीय अधिकारी अर्जुन



पावरा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस विभागातर्फे सशस्त्र मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमास तहसीलदार रेणुका कोकाटे, नायब तहसीलदार महेंद्र फुलझेले, नायब तहसीलदार अजय मल्लेलवार, निरीक्षण अधिकारी प्राजक्ता सोमलकर यांच्यासह स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, सेवानिवृत्त सैनिक तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त बल्लारपूर नगर परिषद यांच्या वतीने सकाळी १०.०० वा ध्वजवंदन कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या प्रसंगी नगराध्यक्षा, नगर परिषद बल्लारपूर डॉ. अल्का अनिल वाढई यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या मूल्यांचा गौरव करण्यात आला. प्रजासत्ताक दिन हा भारतीय संविधान अंमलात आल्याचा गौरवशाली दिवस असून, लोकशाही, अधिकार व कर्तव्यांची जाणीव करून देणारा महत्त्वाचा दिवस आहे. या दिनाच्या औचित्याने उपस्थित सर्व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मुख्याधिकारी विशाल वाघ, उपमुख्याधिकारी रविंद्र भांडारवार, उपमुख्याधिकारी संगिता उमरे, कार्यालयीन अधीक्षक नंदू सातपुते, शहर समन्वयक मयुरी भोयर, नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी, नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविका तसेच विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि शहरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते.

बल्लारपूर शहरातील प्राचीन ऐतिहासिक किल्ल्यावर सकाळी १०.३५ वाजता बल्लारपूर नगर परिषदेचे उपाध्यक्ष देवेंद्र सत्यदेव आर्य यांच्या हस्ते ध्वजारोहन पार पडले. यावेळी गोंड राजाचे वंशज वीरेंद्र महाराज यांच्यासह मुख्याधिकारी विशाल वाघ, अल्का वाढई नगराध्यक्ष बल्लारपूर यांच्यासह माजी नगराध्यक्ष, नगरसेवक अधिकारी व कर्मचारी, पोलीस दल, पत्रकार, शालेय विद्यार्थी व नागरिकांची उपस्थिती होती. बल्लारपूर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. गांधी चौक येथे काँग्रेस चे शहर अध्यक्ष अब्दुल करीम यांचा हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी काँग्रेस चे पदाधिकारी, कार्यकर्ते, नगर सेवक, सेविका उपस्थित होते. यासह बल्लारपूर शहरातील विविध राजकीय पक्षाच्या कार्यालयात (काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, आम आदमी पक्ष) प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यासोबतच अग्निशमन विभाग, पोलीस स्टेशन बल्लारपूर, ग्रामीण रुग्णालय बल्लारपूर, बल्लारपूर शहरातील विविध शाळा महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

## IT फेडरेशन कप स्पर्धेत वॉरिअर तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंचा सहभाग

**अक्षराज : मंगेश औटी**

**दि.२७, नवी मुंबई :** इंडिया तायक्कांदो यांच्या वतीने आणि संघटनेचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर सर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित फेडरेशन कप तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धा दिनांक १८ ते २२



जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडली. या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत देशभरातील विविध राज्ये व अकॅडमीतील तायक्कांदो खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

वॉरिअर तायक्कांदो अकॅडमीकडून साई लांडगे, वेदांत इंगळे, देव गोठणकर आणि रुजुला परब या चार खेळाडूंनी प्रशिक्षक मंगेश औटी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत सहभाग घेतला. सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट तंत्र, शिस्त आणि जिद्द दाखवत आपली कामगिरी सादर केली. या स्पर्धेत अकॅडमीची कामगिरी उल्लेखनीय ठरली असून साई लांडगे याने कांस्यपदकाची कमाई केली. इतर खेळाडूंनाही राष्ट्रीय स्तरावरील कुशल प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळण्याचा मौल्यवान अनुभव मिळाला. ही स्पर्धा देशभरात तायक्कांदो खेळाच्या प्रसारासाठी तसेच उदयोन्मुख खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरली.

# थोडक्यात

## दुसऱ्या फेडरेशन कप तायक्वांडो स्पर्धेत मुंबईच्या खेळाडूंची प्रशंसनीय कामगिरी



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२७, मुंबई :** जयपूर, राजस्थान येथे दुसरी फेडरेशन कप तायक्वांडो २०२५-२६, एस.एम. एस. स्टेडियम, जयपूर, राजस्थान येथे संपन्न झाली. सदर स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास हरिभाऊ बगाडे (गव्हर्नर –राजस्थान), अशोक परणामी, (अध्यक्ष राज्य फॉर्मर, भाजपा), सुभाष मील (लेजिस्लेटिव्ह असेम्ब्ली. खंडाळा, सिकर),नीरज पवन (सेक्रेटरी – युथ अफिअर्स आणि स्पोर्ट्स डिपार्टमेंट), शंकर गोरा (अध्यक्ष – भाजपा युवा मोर्चा, राजस्थान), शाहझाद खान (सेक्रेटरी – राजस्थान तायक्वांडो), संदीप ओंबासे (अध्यक्ष – तायक्वांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र) यांची उपस्थिती होती.सदर स्पर्धेत मुंबई शहरातून १९ खेळाडू महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करीत होते त्यात क्युरिगी स्पर्धेत ऋत्वी गायकवाड हिने रौप्य पदक मिळवले असून, पुमसे स्पर्धेत काव्य धोडायनार याने वैयक्तिक गटात – कांस्य पदक, विहान अय्यर व ताईशा अय्यर यांनी, पेअर (जोडी) गटात – कांस्य पदक प्राप्त केले. ह्या स्पर्धेतील वरिष्ठ (सिनियर) गटातील सुवर्ण पदक विजेते खेळाडूंची निवड आगामी होणाऱ्या २०व्या आशियाई गेम्स स्पर्धेमध्ये होणार आहे. महाराष्ट्र संघाने ४१२० गुण मिळवून प्रथम क्रमांकाचे उच्च स्थान काबीज केले असून संपूर्ण महाराष्ट्र संघासाठी संघ प्रशिक्षक म्हणून मुंबईच्या सिद्धेश घाग यांनी कामगिरी केली. मुंबईच्या खेळाडूंवर सर्वत्र अभिनंदनाचा व वर्षाव होत आहे. संपूर्ण संघास विशेष मार्गदर्शन भास्कर करकेरा (मुंबई अध्यक्ष तथा दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते), संदिप ओंबासे (अध्यक्ष – तायक्वांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र), अमजद खान (गफार) पठाण – (महासचिव), डॉ.प्रसाद कुलकर्णी (खजिनदार) यांचे लाभले. खेळाडुंनी मिळवलेल्या यशाबद्दल मुंबई जिल्हा संघटना महासचिव विल्सन वरळीकर, आंतरराष्ट्रीय पंच उषा शिर्के – धामणसकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू राजेश खिल्लारे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रेमकुमार शेष्ठ, सहाय्यक विरेंद्र गायकवाड, सुनिल साखरकर व संपूर्ण पालक वर्ग यांच्या वतीने कौतुकास्पद प्रशंसा केली जात आहे.

## निलेश अनभवणे यांना राष्ट्रीय सत्यमेव जयते सन्मान २०२६ प्रदान




**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२६, ठाणे :** २६ जानेवारी २०२६ भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पावन पर्वावर ठाणे, महाराष्ट्र येथील साहित्य संपादक व समाजसेवक निलेश यशवंत अनभवणे यांना त्यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राष्ट्रीय सत्यमेव जयते सन्मान २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. ट्रायकलर नेशन फाउंडेशन यांच्या वतीने दिला जाणारा हा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार सत्य की शक्ती, राष्ट्र की प्रगती या प्रेरणादायी संकल्पनेवर आधारित असून, सत्य, निष्ठा आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रदान केला जातो. निलेश अनभवणे यांनी आपल्या संवेदनशील साहित्यिक लेखनातून तसेच सातत्यपूर्ण सामाजिक उपक्रमांद्वारे सांस्कृतिक जाणीव, बौद्धिक प्रगल्भता व सामाजिक जबाबदारी यांचा प्रसार केला आहे. समाजसेवा, मूल्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी ही त्यांच्या कार्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. हा सन्मान ट्रायकलर नेशन फाउंडेशनचे संचालक डॉ. राजीव देशपांडे व व्यवस्थापक कविता मल्होत्रा यांच्या स्वाक्षरीने दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार निलेश यशवंत अनभवणे यांच्या समाजासाठीच्या निष्ठावंत सेवेला दिलेली राष्ट्रीय पातळीवरील पोचपावती असून, नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या युवकांचा सत्कार संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, राजुरा (चंद्रपूर) :** राजुरा तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील युवकांची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल त्यांचा भव्य सत्कार सोहळा स्वामी विवेकानंद अनाथ आश्रम शाळा, रामपूर येथे २६ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. या प्रसंगी ॲड.दीपक चटप यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत युवकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या युवकांनी कठोर परिश्रम, चिकाटी व देशसेवेची भावना ठेवून हे यश संपादन केल्याबद्दल उपस्थित दिलीप देरकर (उपनगराध्यक्ष न.प.राजुरा), दिलीप देठे (उपसरपंच ग्रा.प.भुरकुंडा बूज), स्वप्नील मोहुर्ले (नगरसेवक, राजुरा), शेषराव बोंडे, मारोती लांडे, या सर्व मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. शेतकरी कुटुंबातून येऊन देशाच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे ही अभिमानाची बाब असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या सत्कार सोहळ्यास युवकांचे मित्र व विविध क्षेत्रातील सहकारी किशोर देरकर, दीपक देरकर, खुशाल अडवे, प्रमोद राठोड, सुरज गव्हाणे, साईनाथ पिंपळशेंडे, लक्ष्मण कुळमेथे, सौरभ मादासवार मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## मानसी हाइट्स सोसायटीत सत्यनारायण महापूजा उत्साहात संपन्न

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२७, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली (पूर्व) येथील आजदेगाव परिसरातील मानसी हाइट्स सहकारी गृहनिर्माण संस्थेत दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन मोठ्या भक्तिभावात व उत्साहात करण्यात आले. सदर सत्यनारायण महापूजा केतन माने व अनिता माने यांच्या हस्ते संपन्न झाली. सोसायटीच्या वतीने आयोजित या महापूजेला सर्व रहिवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या धार्मिक कार्यक्रमास विभागातील माननीय नगरसेवक विनोद काळण साहेब तसेच दानशूर व्यक्तिमत्त्व असणारे वासुदेव पाटील व मयुरेश खंडेलवाल यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. महापूजेनंतर विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भजन कार्यक्रम, महिलांसाठी स्पर्धा, हळदी-कुंकू समारंभ, लहान मुलांसाठी विविध स्पर्धा तसेच रेकॉर्ड डान्स यांचा समावेश होता. सायंकाळी सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम शांततामय, शिस्तबद्ध व आनंदी वातावरणात पार पडला. या निमित्ताने मानसी हाइट्स सोसायटीतील सर्व रहिवाशांनी एकत्र येत धार्मिक व सामाजिक एकतेचा सुंदर आदर्श घडवला.

# सोयगाव तालुक्यात गटात ११ व गणात १२ उमेदवारांची माघार

## ९ जागांसाठी ३७ उमेदवार रिंगणात

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२७, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव तालुक्यात तीन गट आणि सहा गणांसाठी मंगळवार, दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा अंतिम दिवशी जिल्हा परिषदेच्या ३ गटात ११ तर ६ गणात १२ असे एकूण २१ उमेदवारांनी निवडणुकी मधून माघार घेतली असून ३ गटांसाठी ११ तर ६ गणांसाठी २६ उमेदवार रिंगणात असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी रूपेश सिनगारे यांनी सांगितले. सोयगाव तहसील कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी रुपेश सिनगारे, सहायक म निषा मेने यांनी माघारीची प्रक्रिया राबविली मंगळवार, दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा अंतिम दिवशी २१ जणांनी माघार घेतली आहे. दरम्यान एकूण५९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरविण्यात आले होते. त्यापैकी गटात २२ तर गणात ३८ उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. परंतु माघारीच्या अंतिम दिवशी २१ उमेदवारांनी माघार घेतली आहे.

यामध्ये फरदापुर गणातून दोन, सावळदबारा गणातून तीन, आमखेडा गणातून एक, निंबायती गणातून तीन, बनोटी गणातून तीन,गोंदेगाव गणातून एकही उमेदवारी अर्ज माघार झाला नाही. त्यामुळे या गणात उद्धव सेना, भाजप, शिंदेसेना, राष्ट्रवादी शरद पवार, राष्ट्रवादी अजित पवार अशी बहुरंगी लढत रंगली आहे फरदापुर गणात शिंदे सेना व भाजप यांच्यात सरळ लढत होत आहे. सावळदबारा गणात एका अपक्ष सह भाजप, शिंदेसेना, राष्ट्रवादी शरद पवार,बसपा, उद्धव सेना अशी लढत होत आहे.

आमखेडा गणात भाजप, शिंदेसेना, वंचित बहुजन अशी तिरंगी लढत होत असून निंबायती गणात शिंदे सेना,भाजप, राष्ट्रवादी अजित पवार, बसपा आणि उद्धव सेना अशी बहुरंगी लढत आहे तर फरदापुर गटातून चार जणांनी माघार घेतली आहे. या गटात भाजप, शिंदेसेना आणि वंचित बहुजन अशी तिरंगी लढत होत आहे आमखेडा गटातून एकही माघार झाली नाही. या गटात शिंदेसेना, भाजप आणि बसप यांच्यात तिरंगी लढत होत आहे गोंदेगाव गटातून दोघांनी माघार घेतली आहे,परंतु या गटात भाजप, शिंदेसेना, उद्धव सेना, राष्ट्रवादी अजित पवार, राष्ट्रवादी शरद पवार अशी लढत होत आहे.

# पुढील महिन्यात म्हाडाची सर्व सामान्यांसाठी तब्बल ३ हजार घरांची लॉटरी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, मुंबई :** दरवर्षी म्हाडाच्या घरांची लॉटरीची आतुरतेने वाट पाहणाऱ्या सर्वसामान्य मुंबईकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची प्रक्रिया संपल्यानंतर लगेचच म्हाडाच्या मुंबई मंडळाने सुमारे ३ हजार घरांची लॉटरी काढण्याची तयारी सुरू केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही लॉटरी मार्चमध्ये जाहीर होण्याची शक्यता आहे.

प्रत्येक इंच जागेला सोन्याचा भाव असणाऱ्या मुंबईत परवडणाऱ्या दरात स्वतःचं हक्काचं घर घेण्यासाठी सामान्य नागरिक म्हाडाच्या लॉटरीच्या प्रतीक्षेत असतात. गेल्या काही वर्षांमध्ये म्हाडाने मुंबईतील मोक्याच्या जागांवर सर्वसामान्यांना अत्यंत माफक दरात घरे उपलब्ध करून दिली आहेत. या घरांची किंमत बाजारभावापेक्षा कैकपटीने कमी असते. त्यामुळे सामान्य मुंबईकर कायमच आपल्याला म्हाडाचे घर लागू दे, अशी प्रार्थना करत असता. येत्या काही दिवसांमध्ये मुंबईकरांची ही इच्छा पूर्ण होऊ शकते. मार्च महिन्यात म्हाडाकडून घरांसाठी लॉटरी काढली जाऊ शकते. मात्र, या लॉटरीत मुंबईतील नेमक्या कोणत्या भागातील घरांचा समावेश असेल, याची नेमकी माहिती अद्याप समोर आलेली नाही.

याशिवाय, म्हाडाच्या कोकण मंडळाच्या सुमारे ४ हजार घरांची लॉटरी काढली जाणार आहे.दरम्यान गेल्या ७६ वर्षांत म्हाडाने राज्यात सर्वसामान्यांना सुमारे ९ लाख परवडणारी घरे दिली आहेत. बी.डी.डी. चाळ, मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्प, जी.टी.बी. नगर येथील पंजाबी कॉलनी, पत्राचाळ, अभ्युदय नगर, पूनम नगर, अंधेरीतील सरदार वल्लभभाई पटेल नगर आदी प्रकल्प नियोजनाच्या टप्प्यात आहेत. म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या घरांना सर्वाधिक मागणी असते, तर कोकण मंडळाच्या घरांनाही चांगला प्रतिसाद मिळतो.




मात्र, कोकण मंडळाच्या काही प्रकल्पांच्या परिसरात अद्याप पायाभूत सुविधा पूर्णपणे विकसित झाल्या नाहीत. त्यामुळे येथील घरांबाबत लॉटरीनंतर नाराजी असते. प्राधिकरणाने रस्ते, पाणी, वीज आदी पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य दिले असून, घरांच्या किमती ही कमी करण्यात आल्या होत्या. त्यामुळे पुढील लॉटरीत कोकण मंडळाच्या घरांना चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.

# महाबळेश्वर मध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२६, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथे उत्साहात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. गिरिस्थान नगरपरिषद येथे नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. सुभाषचंद्र बोस चौक येथे उपनगराध्यक्ष नासिर भाई मुलाणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका, मुख्याधिकारी योगेश पाटील तसेच सर्व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शासकीय कर्मचारी विद्यार्थी तसेच मान्यवर या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाबळेश्वर तहसीलदार कार्यालय येथे सचिन मस्के, पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी विजय विभुते यांच्या हस्ते पोलीस मुख्यालयात पो.



नि. बापूसाहेब सांडभोर, वनविभाग महाबळेश्वर येथे वनक्षेत्रपाल तर महाबळेश्वर अर्बन बँक येथे अध्यक्ष समीर सुतार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महाबळेश्वर नगरपरिषद येथे नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्या नंतर शालेय बँड पथकासोबत प्रभात फेरीस सुरुवात झाली.

ही प्रभात फेरी नगरपरिषद पासून सुभाष चौक मध्ये आली. यावेळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे सुभाष चंद्र बोस व यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यानंतर विद्यार्थी शिक्षक नगरपरिषद कर्मचारी तसेच इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत महाबळेश्वर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष नासिर भाई मुलाणी यांच्या हस्ते सुभाषचंद्र बोस चौका मध्ये ध्वजारोहण करण्यात आले. या ध्वजारोहण सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी येथील सुभाष चौकात नगरवासियांची तसेच पर्यटकांची अलोट गर्दी झाली होती.

यानंतर मुख्य बाजार पेठ मार्गे शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी मुख्य बाजार पेठ मार्गे पोलीस परेड ग्राउंड येथे आली. पोलीस ग्राउंड येथे शालेय विद्यार्थ्या मार्फत मान्यवरांना मानवंदना देण्यात आली. शिस्तबद्ध कवायत कार्यक्रम सादर करण्यात आला. याचबरोबर महाबळेश्वर नगरपरिषदे मार्फत प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस परेड ग्राउंड येथे सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन शून्य कारभाराचा निषेध

## प्रजासत्ताक दिनी बुलढाणा जिल्ह्याचा घोर अपमान



**अक्षराज : रविंद्र सुरूशे**

**दि.२७, मेहकर (बुलढाणा) :** भारताचा प्रजासत्ताक दिन हा जिल्हाभरात नव्हे तर संपूर्ण भारत देशात उत्साहात संपूर्ण झाला. परंतु यामध्ये बुलढाणा जिल्ह्यात अतिशय जिल्ह्याला लाजवेल व जिल्ह्याचा अपमान होईल अशी घटना प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी घडली. असा आक्षेप महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री तथा बुलढाणा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री सुबोध भाऊ सावजी यांनी केला आहे. जिल्ह्यात ध्वजवंदनाचा उत्साहामध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री हे आले नाही. या कृतीतून महाराष्ट्र शासनाच्या अतिशय नियोजन शून्य ढिसाळ कारभार समोर आला आहे. एवढा मोठा सण असून महाराष्ट्र शासनाचा प्रतिनिधी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले नाहीत हा बुलढाणा जिल्ह्याचा अपमान आहे. तसेच जिल्ह्यात केंद्रिय मंत्री माननीय प्रतापरावजी जाधव हे जिल्ह्यातच असताना सुद्धा त्यांना बोलवण्यात आले नाही.

पालकमंत्री हे आजारी होते मग केंद्रीय मंत्री जिल्ह्यातळअ असताना सुद्धा त्यांना बोलावले नाही. जिल्हाधिकारी यांनी ध्वजारोहण केले. एवढीच जर त्यांना हौस होती. जिल्हाधिकाऱ्यांनी हे जाणून-बुजून केले की, नाविलाजाने केले याची चौकशी व्हावी. जर जिल्हाधिकाऱ्यांना समजले की पालकमंत्री झेंडावंदनासाठी येत नाही तर मग त्यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना का सांगितले नाही? याची सखोल चौकशी होऊन अप्पर सचिव यांना निलंबित करावे. किंवा जिल्हाधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करावी अशी मागणी माजी राज्यमंत्री सुबोध भाऊ सावजी यांनी केली आहे. अन्यथा आम्हाला आंदोलनाचे शस्त्र उभाराव लागेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

# १५० दिवसांचा कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श; धाराशिव जिल्हा राज्यात तृतीय

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, धाराशिव :** राज्य शासनाने प्रशासनात अधिक पारदर्शकता, गतिमानता निर्माण व्हावी तसेच नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शासकीय उपक्रम व सुविधांचा थेट लाभ जनतेपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने १५० दिवसांचा विशेष कृती कार्यक्रम राबविला.या कार्यक्रमांतर्गत सर्व उपक्रम प्रभावीपणे व गुणवत्तापूर्ण रीतीने अंमलात आणण्यासाठी राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या कुशल नेतृत्व व दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली १५० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार धाराशिव जिल्हा प्रशासन अधिक सक्षम,तंत्रज्ञानस्नेही व नागरिककेंद्रित करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण प्रणाली विकसित करण्यात आल्या.

यामध्ये डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणाली, तुळजाई चॅटबॉट, कल्पवृक्ष – स्मार्ट जीआर प्रणाली तसेच जीवनरेखा प्रणाली या महत्त्वाच्या डिजिटल उपक्रमांचा समावेश आहे. डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड प्रणालीद्वारे जिल्ह्यातील विविध विभागांच्या शासकीय योजनांचा एकत्रित आढावा घेणे सुलभ झाले आहे.या प्रणालीमुळे योजनांची उद्दिष्टपूर्ती, प्रगतीवर सतत लक्ष ठेवणे व वेळेत पाठपुरावा करणे अधिक कार्यक्षम पद्धतीने शक्य झाले असून प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेला गती मिळाली आहे.

**तुळजाई चॅटबॉट** – ही प्रणाली नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे.या माध्यमातून पुरवठा विभाग, संजय गांधी योजना, नैसर्गिक आपत्ती,आपले सरकार सेवा केंद्रावरील सेवा याबाबतची माहिती काही क्षणांत उपलब्ध होते. जिल्हा संकेतस्थळाशी संलग्न असलेल्या या प्रणालीवरून नागरिक घरबसल्या आवश्यक कागदपत्रांची माहिती, योजना पात्रता तसेच शंकांचे तात्काळ निरसन करू शकतात. मोबाईल, लॅपटॉप किंवा संगणकावर सहज वापरता येणाऱ्या या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचून प्रशासन अधिक गतिमान झाले आहे.

